**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांच्यासह रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार

- देशाला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी तपास यंत्रणा चांगलं काम करत असून अमली पदार्थाचा धंदा करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा केंद्रीय गृहमंत्र्यांचा इशारा

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाच्या तीन उमेदवारांची नावं जाहीर

- अंतराळ स्थानकावर अडकलेले वैज्ञानिक सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर दाखल

**आणि**

- येत्या दोन दिवसात देशाच्या विविध भागांत उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांच्यासह रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार आहेत. जगासमोर असलेल्या महत्त्वाच्या भूराजकीय आणि भूआर्थिक आव्हानांकडे लक्ष वेधण्यासाठी भारत हा संवाद दरवर्षी आयोजित करतो.

राजकारण, व्यवसाय, माध्यमं आणि सामाजिक क्षेत्रातले नेते या संवादात सहभागी होतात.

न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्सन हे आजपासून पाच दिवसांच्या भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात दिली आहे. राष्ट्रपती भवनात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या लक्सन यांची भेट घेऊन भारत-न्यूझीलंड संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा करतील. या दौऱ्यात लक्सन मुंबईलाही भेट देणार असून विविध व्यावसायिकांशी ते संवाद साधणार आहे. लक्सन यांच्या भारतभेटीचा उद्देश दोन्ही देशांमधले संबंध मजबूत करणं हा आहे.

**<><><><><>**

देशाला अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी तपास संस्था चांगलं काम करत असून अंमली पदार्थाचा धंदा करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टद्वारे दिला आहे. इम्फाळमधे नुकतेच ८८ कोटी रुपयांच्या मेथमफेटामाइन टॅब्लेट एनसीबीने जप्त केल्या. तसंच आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ रॅकेटशी संबंधित असणाऱ्या चौघांना अटक केली. गृहमंत्री अमित शहा यांनी या कारवाईचं कौतुक केलं आणि अंमली पदार्थविरोधात कारवाई सुरूच राहील, असं सांगितलं. देशाला अमली पदार्थमुक्त करण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पाचा शहा यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

**<><><><><>**

भारतीय न्याय संहिता कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज ईशान्येकडच्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेणार आहेत. दिवसाच्या सुरुवातीला ते कोक्राझार इथं ऑल बोडो स्टुडन्ट्स युनियनच्या ५७ व्या वार्षिक परिषदेला संबोधित करतील. त्यानंतर ते दुपारी गुवाहाटीला पोहोचतील. तिथे ते आसाम, मेघालय, मिझोराम, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, नागालँड आणि सिक्किमच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेणार आहेत. मणिपूरमधे राष्ट्रपती शासन लागू असल्याने तिथून बैठकीला कोण उपस्थित राहणार हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. दरम्यान, शहा काल मिझोराम इथं आसाम रायफलच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने तीन उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यात छत्रपती संभाजीनगर इथले संजय केणेकर, नागपूरमधले संदीप जोशी आणि वर्ध्यातले दादाराव केचे यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना प्रत्येकी एका जागेवर उमेदवार देणार आहे. ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होते आहे. विधानसभा आमदारांमधून ही निवडणूक होणार आहे.

<><><><><>

आज देशभर राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जात आहे. लसीकरणाबाबत जनजागृतीसाठी  दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. देशातल्या प्रत्येक बालकाचं रोगसंसर्गापासून संरक्षण करण्याच्या हेतूनं लसीकरण आवश्यक असल्याचं आरोग्य मंत्रालयानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या कामी आरोग्य मंत्रालयासह राज्य सरकारं आणि आरोग्य विभागातले कर्मचारी वचनबद्ध असल्याचं या संदेशात नमूद केलं आहे. देशभर लसीकरण होण्याच्या दृष्टीनं २०२४ ला मिशन इंद्रधनुष अभियानाची सुरुवात करण्यात आली असून याचा उद्देश बालमृत्यूचं प्रमाण कमी करणं आणि लसीकरण मोहिमेला गती देणं हा आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर अडकलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आज सकाळी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर पोहोचलं. यात अमेरिका, जपान आणि रशियाच्या चार अंतराळवीरांचा समावेश आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर येत्या बुधवारी पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू करतील, अशी अपेक्षा आहे. त्यांची जागा हे चार नवे अंतराळवीर घेतील. हे दोघे फक्त एका आठवड्यासाठी अवकाशात गेले होते, मात्र तांत्रिक बिघाडामुळे त्यांचा तिथला मुक्काम नऊ महिन्यांपर्यंत पोहोचला.

<><><><><>

व्हाईस ऑफ अमेरिका आणि सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळणाऱ्या इतर संस्थांच्या  पत्रकारांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय काल अमेरिका सरकारने घेतला आहे. व्हाईस ऑफ अमेरिका, रिडिओ फ्री

एशिया, रेडिओ फ्री युरोप आणि इतर प्रसारकांच्या शेकडो कर्मचाऱ्यांना ईमेलद्वारे रजेवर जायला सांगण्यात आलं आहे. त्यांना ओळखपत्र आणि इतर कार्यालयीन सामग्री जमा करायलाही सांगितलं गेलं आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या मध्य आणि दक्षिण भागात झालेल्या वादळामुळे १९जणांचा मृत्यू झाला असून अनेक घर तसंच वाहनांचं नुकसान झालं आहे. रात्रभर या वादळाचा तडाखा बसल्याने, मिसौरीत सर्वाधिक ११ जणांचा मृत्यू झाला असून २९ जण जखमी झाले आहेत. देशभर पसरलेल्या या प्रचंड वादळामुळे शंभरहून अधिक ठिकाणी वणवे लागले असून कॅनडाच्या सीमेवरून टेक्सास पर्यंत ताशी १३० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या नक्षलग्रस्त सुकमा जिल्ह्यातल्या एका दुर्गम गावात पहिला मोबाईल टॉवर उभारण्यात आला आहे. टेकुलागुडेम गावात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीत हा टॉवर उभा केला आहे. या टॉवरमुळे या परिसरातल्या दुर्गम गावांना मोबाईल नेटवर्कची सुविधा मिळणार आहे. माओवाद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी आणि स्थानिक प्रशासनाला मदत करण्यासाठी सीआरपीएफने गेल्या वर्षी टेकुलागुडेम इथं छावणी टाकली होती.

<><><><><>

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद सध्या मुंबईत आले असून त्यांनी आज राजभवनाला सदिच्छा भेट दिली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांचं आदरातिथ्य केलं.

**<><><><><>**

हॉकी इंडिया २०२४मधल्या सामन्यांचं उत्तम प्रसारण केल्याबद्दल प्रसारभारतीला जमनलाल शर्मा पुरस्काराने गौरवण्यात आलं. हॉकी इंडियाचा सातवा वार्षिक पुरस्कारवितरण सोहळा काल नवी दिल्ली इथं झाला. त्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. मेजर ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कार १९७५ मधे विश्वचषक जिंकणाऱ्या संघाला प्रदान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार सविता पुनिया आणि हरमनप्रीत सिंग यांना देण्यात आला, तर सर्वोत्कृष्ट गोलरक्षक म्हणून पी आर श्रीजेशला सन्मानित करण्यात आलं. यंदा भारतीय हॉकीचं शताब्दी वर्ष असून १९७५ मधे प्रथम विश्वचषक मिळवल्याला ५० वर्ष पूर्ण होत असल्यानं हा सोहळा विशेष थाटामाटाने पार पडला.

**<><><><><>**

प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांची प्रकृती स्थिर असून ते रुग्णालयातून घरी परतले आहेत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना आज सकाळी चेन्नई इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांना डीहायड्रेशन आणि पोटाच्या तक्रारींमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, अशी माहिती रहमान यांच्या बहिणीने दिली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भ, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, उत्तर तेलंगणा, पश्चिम बंगाल, सौराष्ट्र तसंच कच्छ या भागांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. ओदिशालाही आज उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट देण्यात आला असून पुढचे दोन दिवस झारखंड आणि पश्चिम बंगालला यलो अलर्ट देण्यात आहे. दरम्यान, उत्तराखंड आणि अरूणाचल प्रदेशात पुढच्या दोन दिवसात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरात विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//